International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 6 July-Aug 2024

# गोतावळा: एक श्रेष्ठ सकस मराठी ग्रामिण कादंबरी (आनंद यादव)

**गजानन दशरथ जंगमवार**
एम. ए. मराठी, सेट
श्री शंकरराव बेझलवार कला व वाणिज्य महाविद्यालय, अहेरी, जि.गडचिरोली
**Corresponding Author: गजानन दशरथ जंगमवार**
**Email:** gjangamwar@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13739121**

**सारांश:**

आनंद यादव १९३५ हे आधुनिक मराठीतील ग्रामिण कवी, कथा – कादंरीकार आणि ग्रामिण चळवळीचे समर्थ समीक्षक आहेत.'हिरवे जग', 'मळ्याची माती', हे काव्यसंग्रह, खळाळ, घरजावई, माळावरची मैना, आदिताल, डवरणी, उखडलेली झाडे, हे कथासंग्रह, 'गोतावळा(१९७९) ,नटरंग, ऐकलकोंडा, माउली, झोंबी, नांगरणी, घरभिंती, काचवेल, या इतर कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

'गोतावळा' ही नारबा या सालदाराने निसर्ग व प्राणिसृष्टीशी जे भावबंध जपले - जोपासले त्यांची कथा आहे. पण यंत्रयुगामध्ये एक यंत्र या सगळ्या भावबंधनांना तोडते व एक शोकांतिका निर्माण होते. निसर्ग आणि माणूस तसेच प्राणिसृष्टी यांचे आदिम नाते यादवांनी अत्यंत कलात्मकतेने चित्रीत केले आहे. पण या नात्याच्या नाजूेतेला नखही लागते. अस्सल ग्रामवास्तव व त्याचे आविष्कारण करणारी, त्या वास्तवाचा अविभाज्य भाग असलेली बोली यांचा गोफ एक कलात्मकता प्रत्ययाला येते. ''जिला खऱ्या अर्थाने प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल. अशी कादंबरी मराठी साहित्यात नव्हती. ज्या होत्या त्या फसव्या, नकली व मध्यमवर्गीय विचार - विकारंच्या सावल्यांनी डागाळलेलया पण आनंद यादवांनी मात्र ही तुट 'गोतावळा' लिहून भरून काढलीय.

**बीजशब्द:** गोतावळा, नारबा, सायुज्जता, बंदिश, मिसफिट, प्राणिजगत, एकटेपणा...

**प्रस्तावना:**

आनंद यादव यांची १९७१ साली प्रसिद्ध झालेली 'गोतावळा' ही मराठीतील महत्वाची कादंबरी आहे. कृषिकेंद्रित जीवनव्यवहार हा ग्रामिण वास्तवाच्या केंद्रस्थानी असतो. शेती–शेतकरी–शेतमजूर–गावगाडा–प्रदेश गावातील स्थानिक स्वराज्य संस्था व बोलीभाषा यांनी ग्रामजीवनाचे वेगळेपण नियत होते. आणि हे वेगळेपण शहरापेक्षा निराळे असते. ग्रामिण वास्त्वाचा वेध घेणाऱ्या बनगरवाडी, धग, या कादंबऱ्यापेक्षा गोतावळा ही कादंबरी वेगळी ठरते. शेतमजूरांबरोबरच पिके, प्राणि,वनस्पती, माती, विहिर, शेती यांचे भावविश्व कसे ओसाड होत आहे ह्या समकालिन ग्रामिण वास्तवाचा वेध यादवांनी 'गोतावळा' मध्ये घेतलेला आहे. शेती - मातीबरोबरच त्या मातीतून उगवलेल्या माणसाचे भावविश्व आधुनिकीकरणामुळे ठासळत जात आहे याची शोकात्म संवेदना 'गोतावळा' ह्या कादंबरी प्रतित होते. शेतीतील जीवनव्यवहाराचे सुक्ष्मदर्शन गोतावळा मधून घडते. मुख्य म्हणजे या जीवनव्यवहारात खूप वैविध्य आहे. 'गोतावळा' कादंबरीतील गोतावळ्याची उद्ध्वस्तता सांस्कृतिक जीवनाच्श विनाशाशी निगडित आहे. हे लक्षात येते. गोतावळा कादंबरीतील गोतावळा व नारबा यांचे हृदयबंध या पार्श्वभूमीवर फार महत्वाचे ठरतात.

'गोतावळा' मधील पात्रांचे वेगळेपण, पात्रांत्री मानवीय सजीवता, नारबाचे निखळ माणूसपण यांचा कलात्मक आविष्कार कादंबरीला एक सौंदर्यपूर्ण रूप देतो. या कादंबरीचे आशयसौंदर्य स्पष्ट करतांना डॉ., बांदिवडेकर म्हणतात की, गोतावळ्यात आरंभापासून अंतापर्यंत भरून राहिलेले दु:ख, प्राण्याच्या, माणसांच्या, निसर्गाच्या विनाशाची करून कहाणी, मरनवी मुल्यांच्या होळीची पूर्ण आच, एका बाजारू संस्कृतीचं निदर्य आक्रमण या सर्वांचा अनुभव तरल संवेदनक्षम मनान घेता आले. तर गोतावळ्याच्या शोकांत भीषण नाट्याची प्रतिती माणसाला विलक्षण हलवून सोडते. सुन्न करते. हादरवून सोडते. हे विवेचन आपल्याला कादंबरी वाचनाची दिशा दाखविणारेचं आहे.

नारबाची मानसिक घडण व कादंबरीचा घटनापट यांच्यातील साहचर्यपर संबंध दर्शविते. डॉ बांदिवाडेकरांनी 'गोतावळ्याची' कलात्मक संरचना उलगडून दाखविलेली आहे. तसेच कादंरीवाङ्मयाचा विशंष अभ्यास असलेले समीक्षक आहेत. हिंदी साहित्याचे सुक्ष्म वाचन असल्यामुळे तौलानिक दृष्टीने ते मराठी कादंबरी वाङ्मयाची चिकित्सा करतात. परिणामत: त्यांच्या समीक्षेला काही परिमाणे प्राप्त होतात. 'मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा' मराठी कादंबरीचा इतिहास' 'हिंदी और मराठीके सामाजिक उपन्यांसोंका तुलनात्मक अध्ययन' सज्ञेय की कविता'. इत्यादी ग्रंथ त्यांचे प्रसिद्व आहेत.

**गोतावळा:**

आनंद यादवांची कादंबरी 'गोतवळा' मराठी कादंबरी साहित्यातील एक लक्षणिय कृती म्हणुन मान्य झालेली आहे. या कादंबरीचे मराठी वाङ्मयातील वैशिष्ट्ये अनेक कारणांनी

नजरेत भरण्यासारखे आहे. पहिल्या वाक्यापासून या कृतीचे वेगळेपण जाणवते ते त्यातील ग्रामिण भाषेच्या आद्योपान्त सर्जनशील उपयोगामुळेच. खर तर पहिल्या शब्दापासूनच या रचनाविश्वाच निराळेपण जाणवू लागते. 'ढोरांच्या वैरणी रचत हुताव. रानातली समदी पिकं खळ्यावरण घराकडे गेलेली'.... हे विश्व माणसाचं असेल तर असो पण ते ढोरांचं - शेताच्या अवतीभवती पसरलेल्या मनुष्येत्तर प्राणिसृष्टीचं अतिशय चित्रमय रीतीनं आणि कृतीशील जीवनाच्या जिवंत आलेखानिशी येणार असल्याची आकांक्षा निर्माण होते. आणि सुदैव असे की ही आकांक्षा पूर्णही होते.

'गोतावळा ' हे ऐका शेतमजूरांच्या मनोव्यथांचे विलक्षण कारूण्यपूर्ण अविष्करण आहे. ही मनोव्यथा उत्कट आहे, तीव्र आहे. प्रभावी आहे. आणि याचे कारण या मनोव्यथेला सशक्तपणे व्यक्त करू शकणारी उद्ध्वस्त जीवनाची प्रचूर शक्तिशाली विभावन सामग्री आहे. या उद्ध्वस्त जीवनाचा उदयास्त अतिशय अस्वस्थ करून सोडणारा आहे. नारबा एका बाजून निराधार, एकटा आणि दुबळा जीव आहे. तर दुसऱ्या बाजूनं त्यानं आपल्या एकटेपणाची खाई आपल्या गुरांढोरांवरच्या अव्याज आपूलकीनं भरून टाकली आहे. या दृष्टीन आनंद यादवांनी त्याच तुडुंब भरलेल्या जीवनाच चित्र जस रसरशीतपणे चितारलं आहे तसचं त्याच अतृप्त एकटेपण आणि असहाय्य दुबळेपण कलात्मक सहानूभूतीने मोठ्या प्रभावीपणे व्यक्त केले आहे. तसेच नारबाला 'गोतावळा' वैविध्यपूर्ण आहे. नारबाचा परिसर आहे म्हणूनच त्या परिसराशी अविभाज्यपणे जुळलेली जनावरच तिथे आहेत. मराठी कादंबरी मानवेत्तर प्राण्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रत्यय देण्याच्या दृष्टीने खूपच दरिद्री आहे. तथाकथीत प्रादेशिक कादंबरी ही याला फारशी अपवाद नाही. यावरून आनंद यादवांनी ही फार मोठी उणीव पहिल्यांदा भरून काढली आहें. निरर्थक जिवन जगणारा - खिन्न म्हातारा पण प्रेम करणारा म्हालिंग्या बैल, नामा कुत्रा व चंपीकुत्री, देवाला सोडलेला कोंबडा, सोन्या व चण्णा बैलाची जोडी या बैलांत कायमच वितूष्ट आणणारी 'ओपला' आलेली पाडी. 'उलट्या डोसक्याची' व उन्हाळा बूळी रेडक, एका काळी राजेशाही थाटात जगलेला पण आता जीव जात नाही म्हणून जगत असलेला आंधळा घोडा, माणसांच्या मृतात्म्याची आठवण देणारे कावळे असे कितीतरी प्राणि गोतावळामध्ये आपल्या व्यक्तिमत्वाची छाप उमटवून जातात.

**गोतावळ्यातील वैविध्यपूर्ण प्राणिजगत:**

आनद यादवांचे प्राणिजगत वैविध्यपूर्ण, चित्रमय गतीमान व जीवंत आहे आणि त्यांच्या अनूभव संसारालाच तो एक अविभाज्य, अपरिहार्य आणि सहज असा आविष्कार आहे. शेताशी व मळ्याशी अगदी निकटचा संबंध असलेली ढोरं म्हणजे बैल, रेडे, गायी-म्हशी तसेच नारबाच्या या गोतावळ्यात कोंबड्याची पिल्लं आहेत. ती पळवून नेणारी मुंगूस आहे. मधूनच धामणी आणि साप येतात. मुंग्यांच्या रांगा, मरणाची वाट पहात जगणारा घोडा, गिधाड, घारी, कावळे, गाढव, सरडे, खारी, बेडक्या, विंचू इतर प्राणी व पक्षी या सर्व प्राण्यांचे एकमेकांशी संवाद या गोतावळ्यात असणारे जवळ जवळ सर्वच प्राणी आपल्या कोणत्या ना कोणत्या वैशिष्ट्यांसह प्रकट झाले आहेत.

**नारबा व गोतावळा यांची सायुज्जता:**

या सर्व गोतावळ्याशी नारबाचे अतिशय गुंतेलपणाचे आहे. नारबाच्या गोतावळ्याला जिवंत स्पर्श देणारे व नारबाच्या स्वभाववैशिष्ट्यांचे असंख्य तपशील जागोजाग आढळतात. आणि म्हणूनच गोतावळा विखुरलेली कादंबरी वाटतच नाही पण ती अतिशय घट्ट विणीची कलाकृती वाटते. बेदराच्या दिवशीचा नारबाचा प्रसन्नपणा आणि मालकाच्या हुकूमशाहीला न जुमानता गुरांढोरांवर माया करणारा त्याचा हट्टीपणा, मालकांशी दोन शब्द उलट बोलणारा आणि झालेला अपमान मुकाटपणे गिळणाऱ्या नारबाची कथा छोट्या छोट्या प्रंसगातून लेखकाने सामर्थ्यानं प्रकट केले आहे.नारबाचे चित्रण एका दृष्टीने सोप वाटण्याची शक्यता आहे कारण लेखकाच्या ज्या जीवनाशी घनिष्ट परिचय आहे व लेखक जे जिवंत चित्र जगला आहे. त्याचा आविष्कार करणं फारसा कठीण नसतं. पण आनंद यादवांचा प्रयत्न तसा सोपा नाही. कारण एका अशिक्षित पणं समंजस असंस्कारक्षम पण अतिशय संवेदनशील मनाचं रेखाटन त्यांना करायचं होतं आणि त्याच्या माध्यमातून बाह्य संस्कृतीत येऊ घातलेला मूलगामी प्रचंड ते व्यंजित करायच होतं ती कलात्मक जबाबदारी यादवांवर आली आणि ती त्यांनी व्यवस्थितपणे पेलली.

**नारबाचे दु:ख:**

नारबा एकटा आहे. जन्मभर लैंगिक अतृप्तीचा शाप त्याला मिळालेला आहे. आणि त्यामुळे त्याला विलक्षण वेदना होत आहे. नारबाच्या मनाची ही अतृप्ती, दडलेली वासना अनेक प्रकारे दिसून येते. नारबा एकटेपणाच्या व्यथेने उदास होतो पण तो त्याचा मुळ स्वभाव नाही. तो श्रमिक आहे. आपल्या मनातलं प्रेमाचं, प्रसन्नतेचं आणि उदारपणाच दान भरभरून देऊ पाहणाऱ्या या नारबाचा एकटेपणाचे, अतृप्तीचं आणि शेवटी विराट निष्फळतेने अनुभवास आलेल्या जीवनाच्या निरर्थकतेचं, बांझपणाच, फुकट गेल्याच दु:ख विलक्षण व्यथित करतो. त्याचा प्रश्न जिव्हारी घाव घालतो. '' कुठ जायचं ह्या मातीत? पाय तरी कसं फुटणार म्हटलं?... किती चालणार ही? काय करू तरी आता''?...काहीतरी मुल्यवान नाहीसं झाल्याची तीव्र वेदना उरी झोंबू लागते. मिसफिट होत चाललेल्या या नारबाचं शोकांत सहृद्याला खूप अस्वस्थ करतं. भारतीय शेतमजूराच्या सहिष्णु व सौम्य स्वभावाप्रमाणे ही चीड विद्रोहाचे रूप कधीच घेत नाही. नारबाच्या रागाचा पारा चढलाच तर तो गुरांढोरांवर. नारबाच मन फक्त एकदाच विद्रोह करतं. चण्ण्याला मरे मरे तो मारणाऱ्या ड्रायव्हरविरूद्ध. एखाद्या दीनवाऱ्या, चेचलेल्या रेड्याप्रमाणे राबणाऱ्या नारबाचा उपयोग संपल्यावर त्याला देशोधडीला लावणाऱ्या मालकाचा

कृतघ्नपणा, आणि क्रौर्य पराकाष्ठेला जातो. तरीही वाचकाला जाणवतं ते मालकाच्या विचारांवर व भावनांवर कब्जा चालवणाऱ्या अर्थ सभ्यतेचे अमानुषिकरण. यामुळेचं गोतावळा कादंबरीला फार मोठे वनज लाभले आहे.

वरील विवेचनावरून 'गोतावळ्याच्या आशयाच्या मोठेपणाबद्दल आणि रचना सौष्ठाबद्दल मी खूप समाधानी आहो. कारण आनंद यादव हे ग्रामिण जीवन उत्तम तऱ्हेने जाणतात हे निश्चितपणे जाणवलं आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. शेतात कष्ट काणाऱ्या सालदार शेतमजूराचे भावविश्व या कादंबरीत केंद्रस्थानी असल्याचे सांगता येईल.

२. नारबाच्या वैविध्यपूर्ण गोतावळ्याचा परिचय करून देता येईल.

३. नारबाच्या दु:खाचे स्वरूप सांगता येईल.

४. शेती - मातीबरोबर त्या मातीतून उगवलेल्या माणसाचे भावविश्व आधुनिकीकरणामुळे ठासळले आहे,
याची शोकात्म संवेदना स्पष्ट करता येईल.

**शोध :**

१. नारबाने आपल्या एकटेपणाची खाई कशाने भरून काढली ते शोधता येईल.

२. नारबाची चीड विद्रोहाचे रूप का धारण करत नाही याचे शोध घेता येईल.

३. गोतावळ्याच्या बंदिशीचं मुख्य सुत्र कोणते हे शोधता येईल.

४. भारतीय शेतकऱ्याचे गुणविशेष याचाही शोध घेता येईल.

**संदर्भग्रंथ :**

1. गोतावळा – आनंद यादव, मेहता पब्लिकेशन हाऊस
2. ठाकुर, रविद्र – साहित्यिक आनंद यादव, बळीवंश प्रकाशन, नांदेड
3. कीर्ती आनंद यादव (संपा) आनंद यादव यांची गोतावळा : साद आणि प्रतिसाद.